# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

२५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ Email : jdtepu@pn3.vsnl.net.in

जा.क्र. : तंशि.विकापु/मा.अ-२००५/२००८/3239 दिनांक :२२-०४-२००८

23 APR 2008

प्रति,

प्राचार्य
शासकीय व शासकीय अनुदानीत
अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तंत्स्‌म संस्था.

विषय :- माहितीचा अधिकारांतर्गत मासिक विवरणपत्रे वेळेत पाठविणेबाबत.

संदर्भ :- १) प्र. ल. दरडे, कक्ष अधिकारी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र. माअका-२००८/प्र.क्र२८/आस्था-२ दिनांक २८-०२-२००८
२) प.बा. तांबे, सहाय्यक संचालक (अता) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र १६/संकर्णि२००८ श. ४४५ दिनांक ११-०३-२००८.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माहिती अधिकारातील मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या ४ तारखेच्या आत या विभागीय कार्यालयास पोहचतील या बेताने पाठविण्याबाबत आपणास वारंवार कळवून देखील आपल्या संस्थांची मासिक विवरणपत्रे या कार्यालयास विहित मुदतीत प्राप्त होत नाहीत. सदर ची विवरणपत्रे हि ७ तारखेच्या आत शासनास सादर करावयाची असल्याने आपण विहीत मुदतीतच विवरणपत्रे या कार्यालयास सादर करावी. विवरणपत्रास विलंबझाल्यास होणा-या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी ही आपलीच असेल.

आपणास कळविण्यात येते की, ब-याच वेळा आपल्या संस्थेच्या विवरणपत्र क्र १,२ व ४ मधील आकडयांचा ताळमेळ जुळतनाही व सदर माहिती हि बिनचुक दिलेली नसते. विशेषतः विवरणपत्रातील मागील महिन्याचे अखेरीस प्रलंबित अर्ज, अपिल यांची संख्या समान असणे आवश्यक आहे. तसेच निकाली काढलेले अर्ज, अपिल यांची फोड (निकाली काढलेले अर्ज = माहिती दिलेले अर्ज + माहिती नाकारलेले अर्ज) अशी असणे आवश्यक आहे. तसेच माहितीची विवरणपत्रे हि विवरणपत्र क्र १,२,४ व ५ मध्ये भरुन पाठविणे आवश्यक आहे. तरी पुढील दर महिन्यांची माहिती विहित कालावधीत सादर करताना वरील सूचनांचे कटाक्षाने पालन होईल याची सर्व संबधीतांनी खबरदारी घ्यावी.

(प्रा. गो. पं. चौधरी),
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :- श्री. शिंदे प्रोग्रामर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी संकेतस्थळावर सदर पत्र प्रदर्शित करावे

F/sab /Mahiticha Adhikar/343